**पुष्प – ६ : भागवत धर्मसाधना**

**या नाम एक भागवतधर्म**

१. भागवत धर्माची व्याख्या काय...? सतत कार्यरत राहणे आणि झालेले प्रत्येक काम देवाला अर्पण करणे हा भागवत धर्माचा गाभा.

२. आपले काम करणे, तेही शुद्ध बुद्धीने, हाच भागवत धर्म. बुद्धी शुद्ध व मंगल बनावी याचसाठी नामचिंतन.

३. हातून घडलेली अथवा केलेली कामे हीच फुले व पत्री : त्याच फुलांनी केलेली पूजा विठ्ठलाला आवडते.

४. अशी पूजा साधली सांवतामहाराजांना : जगण्यासाठी भाजीपाला तर आपले जगणे शुद्ध व मंगल बनावे यासाठी मूल्यांची लागवड आणि जपणूक : सांवतामहाराजांची कथा.

************************************************

**संतबोल**

- हेतुक अथवा अहेतुक। वैदिक लौकिक स्वाभाविक।
  भगवंतीं अर्पे सकळिक। या नांव देख 'भागवतधर्म'।। (ए.भा. २.३४७)
- तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा। पूजा केली होय अपारा। तोषालागीं।। (ज्ञा. १८.९१७)
- कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।। (श्रीसांवतामहाराज)
- आमुची माळियाची जात। शेत लावूं बागाईत। शांति शेवंती फुलली। प्रेम जाईजुई व्याली।। (श्रीसांवतामहाराज)
- जें जें कर्म स्वाभाविक। तें तें ब्रह्मार्पण अहेतुक। या नांव भजन निर्दोख। 'भागवत धर्म' देख यां नाव।। (ए.भा. २.४५२)

**मंजिरी – ६**

१. कर्म, विकर्म आणि अकर्म : तीन संकल्पना. विनोबांची गीता प्रवचने.

२. शारीर कर्म आणि त्याचा आंतरिक परिणाम.

३. महाभारतातील तुळाधार वैश्याची कथा : गुरू नानकदेवांची कथा व अवस्था.

४. भक्तीचा कर्माशी अविरोध.

५. गोकुळातील गोपी हे भक्तिमय कर्माचे आदर्श उदाहरण.

**************************************************

**संतबोल**

- कामांमध्यें काम। कांहीं म्हणा राम राम। जाईल भवश्रम। सुख होईल दु:खाचें।। (श्रीतुकोबाराय)
- त्यांचें ध्यानीं मनीं सर्वभावें हरि। देह काम करी चित्त त्यापें ।। (श्रीतुकोबाराय)
- मन हें गोविंदीं देह काम करी वो।। (श्रीतुकोबाराय)
- असोनि संसारीं जिव्हे वेगु करीं। वेदशास्त्र उभारी बाह्या सदा।। (श्रीज्ञानोबाराय)
- मग ययाचि गा कपिध्वज। स्वकर्माचिया महापूजा।
  तोषला ईशु तमरजा। झाडा करूनि।। (ज्ञा. १८.९५२)